दि.दावा क. १६१/१२
किसनाबाई वि सुर्यप्रकाश
नि.क्र. ६९

**प्रतिवादी क. १ करीता उलट तपास ॲड. श्री ए बी पोंगडे यांचेमार्फत पुढे शपथेवर सुरु :-**

माझे वडिलांचे नाव नारायण असे आहे व आईचे नाव विठाबाई आहे. बाजीराव हे माझे आजोबा होते. हे म्हणणे बरोबर आहे की,सिताराम हे पणजोबा होते. हे म्हणणे खरे आहे की,सिताराम यांना एकुण चार मुले होती. ती म्हणजे बाजीराव, उरकुडा, दाजीबा व राजाराम. हे म्हणणे खरे नाही की,उरकुडा यांचे लग्न झाले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की,उरकुडा यांना अपत्य नाही. बाजीराव यांची, वडील नारायण व आत्या जयवंताबाई ही दोन मुले. आत्या जयवंताबाई हयात आहे. हे म्हणणे खरे आहे की,माझी आई विठाबाई ही वडिलांची पहीली पत्नी आहे. आईचे निधन केव्हा झाले हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की,आईचे निधनानंतर वडिलांनी सावत्र आई ध्रुपदाबाई हिचेशी लग्न केले. हे म्हणणे खरे आहे की,वडिलांना ध्रुपदाबाई हिचे पासुन सुर्यप्रकाश व चंद्रप्रभा अशी दोन मुली झाली.

हे म्हणणे खरे आहे की,माझे लग्न पाचगाव येथील हरिदास मेश्राम यांचेशी १९६३ साली झाले. हे म्हणणे खरे नाही की,पतीची पाचगाव येथे शेती होती. मात्र हे म्हणणे खरे आहे की,ते टेलरिंग काम करीत. मला दोन मुलं व तीन मुली आहेत. माझे एका मुलाचे सोडुन इतर सर्व मुलांची लग्न झालेली आहेत. पतीचे निधन केव्हा झाले हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की,पतीचे निधनानंतर मीच मुलांची लग्न करुन दिली आहेत. मी गेली १०-१५ वर्षापासुन नागपूर येथे राहत आहे. आम्ही एकत्र कुटुंबात राहतो. एक मुलगा पेंटींगचे काम करतो व दुसरा टेलरिंग चे काम करतो. हे म्हणणे खरे नाही की,नागपूर येथे आमचे मालकीचे घर आहे. हे

म्हणणे खरे आहे की,आमचे कुटुंब दारिद्रय रेषेखाली येते असे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की,घरी दिवाण, सोफा, टीव्ही, फ्रिज अश्या वस्तु आहेत. हे म्हणणे खरे आहे की,या दाव्याचे कामी मी आजपर्यंत ४ ते ५ वकील नेमले. हे म्हणणे खरे आहे की,वकीलांची फी मीच दिली आहे. मी किती फी दिली याची नोंद ठेवलेली नाही. मी आजतागायत एक लाख रुपयांचे वर फी पोटी खर्च केला किंवा कसे हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की,मला उत्पनाचे साधन आहे व नादार म्हणुन खोटा अर्ज केला. मला –हदयाचा विकार आहे व दिवसाआड ४०००/–रुपये लागतात.

मिळकत नारायण यांची वडिलोपार्जित आहे असे दर्शविणेकरीता कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की,नारायण यांनी दि ८.३.१९५६ रोजी बाजीराव यांचेकडुन दावा मिळकत खरेदी केली होती. दि. १३.५.१९५७ रोजी नारायण यांनी मौजे दहेगाव येथे जुना सर्व्हे नंबर ५/१ ही मिळकत हिरामण व इतर लोकांकडुन खरेदी केली किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. त्याचप्रमाणे वडील नारायण यांनी मौजे सायकी येथे, श्री मोडकु यांचे कडुन जुना गट क्र. ६०/३ आराजी ६ एकर अशी मिळकत खरेदी केली किंवा कसे हे सांगता येणार नाही. सावत्र आई ध्रपुदाबाई हिने १२.३.६४ रोजी श्री दामोधर यांचेपासुन ५.४१ एकर एवढी मिळकत मौजे सायकी येथे खरेदी केली किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. (वादीचे वकीलांनी प्रतिवादी यांनी आपले वाद कथनामध्ये याप्रमाणे बचाव घेतलेला नाही व सदरहु प्रश्न हे संबंधीत नाही असा आक्षेप घेतला. कैफियत पाहता प्रतिवादी यांनी दावा मिळकती या स्वकष्टार्जित आहे असे वाद कथन केल्याचे दिसुन येते. सबब आक्षेप फेटाळण्यात येते. )

माझे काका उरकुडा यांनी मौजे पारडगाव येथे श्री दिवाकर यांचे कडुन शेती खरेदी केली होती किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. काका उरकुडा यांनी त्यांची मिळकत वडील नारायण यांना दि. २३.६.६२ रोजी मृत्युपत्राने दिली किंवा कसे हे मला माहित नाही. १९७४ मध्ये मौजे दहेगाव येथे सर्व्हे नंबर ८४ अशी मिळकत माझे नावे झाली किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की,वडिलांनी मिळकतीचे वाटप करुन सव्हे नंबर ८४ मला दिला होता. हे म्हणणे खरे नाही की,वाटपा मध्ये प्रतिवादी क्र. २ चंद्रप्रभा हिला मौजे दहेगाव येथे सर्व्हे क्र. ८६ ही मिळकत दिली. हे म्हणणे खरे नाही की,आमचे वाटयास आलेली मिळकत ही शासनाने तलावाचे कामी संपादीत केली. हे म्हणणे खरे नाही की,सरकार कडुन आमचे मालकीची मिळकत संपादीत केले प्रकरणी आम्हांला नुकसान भरपाई देखील मिळाली आहे. वडिलांनी १९७४ मध्ये सायकी येथील सर्व्हे क्र. २२२ ही प्रतिवादी क्र. १ सुर्यप्रकाश यांचे नावे करुन दिली किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की,पारडगाव येथील मिळकत सर्व्हे नंबर १३७ ही देखील प्रतिवादी क्र. २ यांना वाटपामध्ये मिळाली. हे म्हणणे खरे आहे की,प्रतिवादी क्र. १ यानी प्रतिवादी क्र. ४ नामदेव याला सर्व्हे नंबर १३७ विकली आहे. हे म्हणणे खरे नाही की,वाटपा मध्ये वडिलांनी जुना गट नंबर ८३ व १२ अशी मिळकत स्वत: करीता ठेवली होती. आज मितीस गट नंबर ८३ व १२ ही प्रतिवादी यांचे नावे आहे किंवा कसे हे मला माहित नाही .हे म्हणणे खरे नाही की,वडिलांनी दि. १.७.१९८९ रोजी मृत्युपत्र करुन गट क्र. ८३ व १२ ही प्रतिवादी नंबर एक याला दिली आहे.

हे म्हणणे खरे आहे की,१९९७ मध्ये मी श्री ठाकुर वकील यांचे मार्फत प्रतिवादी क्र. १ याला नोटीस पाठवली होती. हे म्हणणे खरे

आहे की,नोटीस मधील माहिती वकीलांना मीच दिली. हे म्हणणे खरे आहे की ,यानंतर २२.११.२००४ रोजी प्रतिवादी यांस श्री रामटेके वकील यांचे मार्फत पुन्हा नोटीस पाठवली. हे म्हणणे खरे आहे की,यानंतर ३.१.२००५ रोजी श्रीमती धोटे वकील यांचे मार्फत प्रतिवादीला तिसरी नोटीस पाठवली. हे म्हणणे खरे नाही की,१९७४ पासुनच दावा मिळकतीचे पुर्वी वाटप झाले आहे याची मला कल्पना होती. हे म्हणणे खरे नाही की,प्रतिवादी क्र. १ याचे नावे झालेल्या फेरफार नोंदींविरुद्ध उपविभागीय अधिकारी यांचेकडे अपिल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे अपिल फेटाळुन लावण्यात आले होते.

माझे सर तपासाचे शपथपत्रातील कथन की,मी एक लाख रुपयाचे तीन वर्षाचे उत्पन्न मिळण्यास पात्र आहे हे कथन बरोबर आहे. असे उत्पन्न मी कसे काढले असे काही सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटे उत्पन दर्शविले आहे. गट क्र. ८४ ही मिळकत सिलिंग मध्ये माझे नावे लागली असे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मिळकत मला सिलिंग मध्ये नाहीतर वाटपाने लाभली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मुदतबाहय आहे. हे म्हणणे खरे नाही की,१९७४ मध्ये वडील व वादी प्रतिवादी यांच्यात वाटप झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की,दावा मिळकती मयत नारायण यांच्या स्वसंपादीत आहे. हे म्हणणे खरे नाही की,खोटा दावा केला व खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क. २ व ४ तर्फे उलट तपासाकरीता तहकुब.**

वा.दा.ब.अ.क.केले.
समक्ष,

(एस.व्ही. देशमुख)
दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),

उमरेड.
दि.५.८.१७